# आनंदाचे प्रवेशद्वार

## सुजाता रिंगावा

माझ्या आध्यात्मिक यात्रेवर स्वतःच्या पद्धतीने साधारण चार वर्षे वाटचाल केल्यानंतर, वर्ष १९७८मध्ये बाबा मुक्तानंदांसमवेत होणाऱ्या शक्तिपात ध्यानशिबिरामध्ये मी पहिल्यांदा भाग घेतला. माझे पती मार्सेल वर्ष १९७४पासून सिद्धयोग शिकवणींचे अनुसरण करत होते, त्यांच्याकडून मला बाबांविषयी माहिती मिळाली होती; परंतु एखाद्या विशिष्ट मार्गाप्रति स्वतःला समर्पित करण्याबाबत सावध राहिले पाहिजे असे मला वाटत होते. तथापि, काही काळ लोटल्यावर माझ्यामध्ये स्वामी मुक्तानंद यांच्याविषयी जाणून घेण्याची उत्सुकता वाढली आणि हे जाणून घेण्याविषयीसुद्धा की, कॅलिफोर्नियातील ओकलँड येथील सिद्धयोग आश्रमात होणाऱ्या आगामी ध्यानशिबिरामधून माझ्यासमोर काय प्रकट होईल.

ध्यानशिबिरात मला जे मिळाले, त्याची मी कधी कल्पनादेखील केली नव्हती. एका ध्यानसत्रात बाबा जेव्हा ध्यानाच्या हॉलमध्ये सहभागी लोकांच्या जवळ जाऊन त्यांना शक्तिपात दीक्षा प्रदान करत होते, तेव्हा त्यांनी माझ्या डोक्यावर स्पर्श केला. त्या क्षणी मला जाणवले की, मी माझ्या अंतरी खोल-खोल जाते आहे. खोलवर उतरत, उतरत मी माझ्या अंतरीच्या सर्वात गहिऱ्या स्थानी पोहोचले. तिथे मला एक प्रवेशद्वार दिसले. याआधी मी स्वतःला ज्या सीमित दृष्टीकोनाने पाहत असे, तो मला त्या प्रवेशद्वाराच्या वर दिसला—स्वतःविषयी मी बनवलेल्या पूर्वधारणा, आलोचना, गुणदोष इत्यादी. नंतर ते दार उघडले आणि मला माझ्या खऱ्या आत्म्याचे दर्शन झाले—स्वतःची असीमित योग्यता, चांगुलपणा आणि प्रकाश.

त्या सप्ताहान्ती अश्रुधारांचा पूर लोटला—आनंदाश्रू आणि या नवप्राप्त बोधामुळे माझ्या अंतरी उचंबळून आलेल्या भावनांचे अश्रू.

ध्यानशिबिराच्या समापनानंतर जेव्हा बाबांनी दर्शन दिले, तेव्हा माझे पती मार्सेल यांनी बाबांना माझा परिचय करवून दिला. मी माझ्या पतींना सांगितले होते की, त्यांनी बाबांना हे जरूर सांगावे, की मी किती खूश आहे आणि हेदेखील, की या ध्यानशिबिराच्या चार वर्षे आधीपासून मी बाबांना ओळखते.

मार्सेलनी माझे म्हणणे बाबांना सांगितल्यावर, बाबांनी त्यांचा चष्मा त्यांच्या नाकावर जरा खाली सरकवला आणि त्याच्या वरून माझ्याकडे पाहिले व ते म्हणाले, "पाहिलेस! तू जर चार वर्षे आधीच ध्यानशिबिरात भाग घेतला असतास, तर इतकी वर्षे अशीच आनंदी राहिली असतीस ना!"

बाबांचे ते शब्द थेट माझ्या हृदयात प्रवेशले आणि त्यामुळे माझ्यात एक अनोखा बदल होऊ लागला. माझ्या लक्षात येऊ लागले की, मी स्वतःच असा विचार करत होते की, मी पृथक आहे आणि अशा प्रकारच्या विचारांमुळे व कल्पनांमुळे मीच स्वतःचा आनंद नष्ट करत होते. मी हे जाणले की, माझा आनंद कुठल्याही बाह्य गोष्टीवर निर्भर नाही. माझ्या प्रथम सिद्धयोग शक्तिपात ध्यानशिबिरात भाग घेऊन आता चाळीस वर्षांपेक्षा जास्त कालावधी लोटला आहे आणि मंत्रजप व ध्यान या कृपापूरित अभ्यासांद्वारे आनंदाचे हे आन्तरिक प्रवेशद्वार मी निरंतर उघडत राहिले आहे.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.